IIPIMRJ | IIP International Multidisciplinary Research Journal

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# महात्मा गांधीजींचा रोजगार निर्मितीचा दृष्टिकोन

**श्री कुबेर दिनकर दिंडे**
सहायक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स , कोल्हापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 31st Dec 2025
Accepted: 15th Jan 2026
Published: 22nd Jan 2026

***Keywords:***
महात्मा गांधी
रोजगार

**ABSTRACT**

भारत देशाने १९५१ पासून नियोजनाला सुरुवात केली आहे.आजपर्यंत एकूण तेरा पंचवार्षिक योजना राबवलेल्या आहेत, या प्रत्येक पंचवार्षिक योजनेचे देशात रोजगार निर्माण करणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट होते असे असूनसुद्धा आज आपल्या देशात बेकारी सारखी समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. महात्मा गांधीजी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात आपले आर्थिक विचार मांडलेले आहेत, हे विचार आजही या बेकारी सारख्या समस्येवर उपयोगी आहेत कारण त्यांनी सुरु केलेल्या खादी आणि ग्रामोद्योग सारख्या एका छोट्या उद्योगामुळे देशभर रोजगाराचे जाळे निर्माण झाले आहे, त्यामुळे जर महात्मा गांधीजी यांचे सर्व आर्थिक विचार आजच्या परीस्थितीत अमलात आणले तर देशाच्या समोरील बहुतांश आर्थिक प्रश्न दूर झाल्याशिवाय राहणार नाहीत.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Dinde, K. D.** (2026). ***महात्मा गांधीजींचा रोजगार निर्मितीचा दृष्टिकोन*** (Mahatma Gandhiji's perspective on employment generation). IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), **3(1)**, pp. **5–9**.

- **प्रस्तावना :**

जगातील लोकांना गांधीजींच्याबद्दल जितके कुतूहल आहे जितके कुतूहल भारतीय लोकांना गांधीजीच्याबद्दल नाही, महात्मा गांधीजींना आपल्या देशात जितका मानसन्मान आहे, त्यापेक्षा जगात कितीतरी पट जास्त मानसन्मान आहे. महात्मा गांधीजी यांच्या नेतृत्वाखाली आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले,त्यांनी १९१५ नंतर भारतीय राजकारणात सक्रिय भूमिका बजावली, यासाठी त्यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सांगण्यावरून प्रथम संपूर्ण देश फिरून बघितला. विशेषत : १९२० ते १९४८ हा काळ गांधीजींचा काळ म्हणून ओळखला जातो. या स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी जे आर्थिक विचार मांडले ते आजच्या वर्तमान परिस्थितीमध्ये रोजगार निर्माण करण्यासाठी उपयोगी ठरू शकतात का हा या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश आहे. महात्मा गांधीजीनी अनेक विषयासंबधी आपले विचार मांडलेले आहेत. काही वेळेला तर त्यांनी आपले विचार आपल्या कृतीतून मांडलेले आहेत यासाठी त्यांनी आपल्या अनुयायांना 'करके देखो' असा मंत्रही दिलेला आहे. अर्थशास्त्राच्या बाबतीत हि त्यांनी आपले विचार फक्त लिखित स्वरुपात न मांडता आपल्या कृतीतून मांडले आहे आजच्या या आधुनिक, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या , डिजिटल युगात रोजगार निर्मितीसाठी गांधीजींच्या विचारातून काय मार्ग मिळू शकेल काय त्याचा शोध घेण्याचा या संशोधन लेखाचा प्रयत्न आहे.

- **संशोधन लेखाचे उद्दिष्ट** :

वर्तमान परिस्थितीत गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या मुळे रोजगार वाढ होऊ शकते का याचा अभ्यास करणे.

- **गृहीतक:**

  - **शून्य गृहीतक:** महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारामुळे रोजगार वृद्धी होऊ शकत नाही.
  - **पर्यायी गृहीतक :** महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारामुळे रोजगार वृद्धी होऊ शकते.

- **संशोधन पद्धती :**

संशोधकाने या संशोधन लेखासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे.

- **महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार :**

महात्मा गांधीजींनी अर्थशास्त्र संदर्भात स्वतंत्र ग्रंथसंपदा लिहिलेली नाही. त्यांच्या संपूर्ण जीवनामध्ये जेव्हा जेव्हा सार्वजनिक प्रश्न, समस्या सोडवण्याची वेळ आली तेव्हा त्यांना जे उपाय सुचले ते त्यांनी मांडलेले आहेत, गांधीजींचे अर्थशास्त्र असे कोणतेही अर्थशास्त्र ते जिवंत असताना अस्तित्वात नव्हते, तर त्यांचे एक अनुयायी जे.सी. कुमारप्पा यांनी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे आर्थिक विचार संकलित केले आणि तेच गांधीजींचे अर्थशास्त्र म्हणून आज प्रचलित आहे. असे असले तरी आजही महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या उपयुक्ततेबदल संपूर्ण जगभर चर्चा होत असते, परिसंवाद होत असतात, विचारमंथन होत असते.महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारामध्ये पुढील संकल्पना समाविष्ट होतात, सर्वोदय, विश्वस्त संकल्पना, यंत्रासंबंधी विचार, ग्राम स्वच्छता ,ग्रामस्वराज्य, नैसर्गिक साधनसंपत्ती, विकेंद्रीकरण, लघुउद्योग, स्वदेशी, श्रमप्रतिष्ठा, विकेंद्रीकरण , लघुउद्योग, खादी आणि ग्रामोद्योग, सागरी अर्थनीती, तलाव अर्थनीती, अहिंसक अर्थव्यवस्था, शेतीबाबतचे विचार, दारिद्र्य विषयक विचार,तंत्रज्ञान विषयक विचार असे असले तरी त्यांचे रोजगार विषयक विचार हे या सर्व आर्थिक विचारात मिसळून गेले आहेत.

- **महात्मा गांधीजींचा रोजगार विषयक दृष्टीकोन** :

महात्मा गांधीजींनी त्यांचा रोजगार विषयक दृष्टिकोन मांडत असताना स्वावलंबन, समुदायिक विकास, मानवी प्रतिष्ठा, श्रमप्रतिष्ठा आणि नैतिकता इत्यादी दृष्टिकोनातून मांडलेला आहे. त्यांच्या रोजगार विषयक दृष्टिकोनातून कोणत्याही प्रकारची शोषण व्यवस्था निर्माण होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली होती. त्यांच्या रोजगार निर्मिती विषयक दृष्टिकोनात रोजगार निर्मिती आणि सामाजिक न्याय यांचा सुंदर समन्वय आपल्याला दिसून येतो, जो आपल्याला आजच्या व्यवस्थेत

दिसून येत नाही. त्यांनी व्यक्तीला आत्मनिर्भर बनवता येईल अशा पद्धतीच्या रोजगार निर्मितीवर भर दिला. यासाठीच त्यांनी खादी आणि ग्राम उद्योगासारखे व्यवसाय सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी श्रमप्रतिष्ठा या तत्त्वाला खूपच महत्त्व दिले त्यांच्या दृष्टिकोनातून शारीरिक श्रम आणि बौद्धिक श्रम समान महत्त्वाचे आहेत असे मानले. महात्मा गांधीजींनी नेहमी गावांच्या विकासाकडे विशेष महत्त्व दिले, कारण प्रत्येकाला त्यांच्या गावातच स्थानिक रोजगार मिळावा जेणेकरून शहरामध्ये होणारी गर्दी आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न हे निर्माण होऊ नयेत हा त्या पाठीमागे उद्देश होता. त्यांच्या रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनामध्ये विकेंद्रीकरण याला एक महत्व होते, त्यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्य हि संकल्पना मांडली.

- **खादी आणि ग्रामोद्योग :**

स्वातंत्र्यपूर्व काळात १९२५ मध्ये पाटना येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या दरम्यान महात्मा गांधी यांनी 'भारत चरखा संघाची' स्थापना केली होती आणि याच भारत चरखा संघाचे १९५७ मध्ये खादी आणि ग्रामोद्योग आयोगामध्ये करण्यात रूपांतर आले. खादी आणि ग्रामोद्योग आयोग हा भारत सरकारच्या सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अधीन १९५७ पासून काम करत असून या आयोगाकडून ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, स्वावलंबन आणि सामाजिक समावेशन साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो.

**खादी आणि ग्रामोद्योगांतर्गत येणार उद्योगांचे प्रकार :**

**१) कापड आणि वस्त्र उद्योग:**

यामध्ये हाताने विणलेली कापड, पॉली वस्त्र, सोलर वस्त्र इत्यादींचा समावेश होतो आणि याद्वारे साडी, धोतर, शर्ट , शाल, बेडशीट, टॉवेल्स आणि बॅग्स तयार केल्या जातात.

**२) ग्रामीण उद्योग**

ग्रामीण उद्योगाचे सात गटांमध्ये विभाजन केले आहे.

१) खनिजा आधारित उत्पादन
२) वनस्पती आधारित उत्पादन
३) कृषी व अन्नप्रक्रिया उद्योग
४) रबर, प्लास्टिक रासायनिक उद्योग
५) अभियांत्रिकी व नॉन कन्वेंशन ऊर्जा उद्योग
६) हस्तकला उद्योग
७) सेवा उद्योग

या सात उद्योग अंतर्गत कुंभारकाम , मातीची भांडी, बासरी, अन्नप्रक्रिया, चहा उत्पादन, साबण, अगरबत्ती, लाकडी वस्तू, बांबू क्राफ्ट इत्यादी वस्तू तयार केल्या जातात.

**३) इतर उद्योग :**

यामध्ये हनी मिशन अंतर्गत मधमाशीपालन आणि मध उत्पादन याशिवाय कुंभार सशक्तिकरण हे उपक्रम हाती घेतले जातात.हनी मिशन अंतर्गत स्वीट क्रांती निर्माण करण्यासाठी काही गावांमध्ये 'मधाचे गाव' हा उपक्रम राबवण्यात येतो आणि आजपर्यंत महाराष्ट्रात काही गावे हि मधाची गावे म्हणून ओळखली जातात. संशोधकाने यापैकीच एक मधाचे गाव असलेले कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील पाटगाव संशोधनाच्या प्राथमिक सामग्री साठी निवडले आहे. कुंभार सशक्तिकरण या उपक्रमात इलेक्ट्रिक चाकांचे वितरण आणि त्या संदर्भात प्रशिक्षण दिले जाते.या खादी आणि ग्रामोद्योगाच्या माध्यमातून झालेली आर्थिक प्रगती पुढील प्रमाणे:

तक्ता क्रमांक. १

खादी आणि ग्रामोद्योग प्रगती

| वर्ष | उत्पादन (कोटी रु.) | विक्री (कोटी रु.) | रोजगार निर्मिती (लाखात) |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| २०००-२००१ | ७१६३ | ८७४५ | ८२.३ |
| २००१-२००२ | ७७८० | ९२२० | ८४.०२ |
| २००२-२००३ | ८३८५ | १०४०५ | ८४.३२ |
| २००३-२००४ | ९६४६ | ११९८५ | ८५.०५ |
| २००४-२००५ | ११०७१ | १३१११९ | ८६.३ |
| २००५-२००६ | १२४४५ | १५०७९ | ८७.५ |
| २००६-२००७ | १३८५२ | १६७३६ | ८८.६ |
| २००७-२००८ | १६८८८ | २०१४५ | ९१.१ |
| २००८-२००९ | १९६८७ | २२८०६ | ९४.२ |
| २००९-२०१० | २१२५० | २४५०० | ९६ |
| २०१०-२०११ | २१८५२ | २६७९७ | ११९.१ |
| २०११-२०१२ | २४०२४ | २७८२९ | १२४ .७६ |
| २०१२-२०१३ | २६१०७ | ३११५२ | १४०.३८ |
| २०१३-२०१४ | २७५६९ | ३३१३५ | १३४.२५ |
| २०१४-२०१५ | ३४४९० | ४१८९४ | १३७.८३ |
| २०१५-२०१६ | ४२६३१ | ५२१३८ | १३६.४ |
| २०१६-२०१७ | ४५७२५ | ५५७५० | १३७.७९ |

तक्ता क्रमांक ६.२ मध्ये संशोधकाने खादी आणि ग्रामोद्योगाच्या २०००-२००१ पासून २०१६-२०१७ या कालावधीत झालेली आर्थिक प्रगती दर्शवलेली आहे. या तक्त्यानुसार २०००-२००१ मध्ये खादी आणि ग्रामोद्योगाचे एकूण उत्पादन ७,१६३ कोटी रु. किमतीचे होते, विक्री ८,७४५ कोटी तर रोजगार निर्मिती ही ८२.३ लाख एवढी झालेली होते, त्यानंतर २०१६-२०१७ पर्यंत ही आकडेवारी वाढत गेलेली आपल्याला दिसून येते, २०१६-१७ मध्ये खादी आणि ग्रामोद्योगाच्या माध्यमातून उत्पादन ४५,७२५ कोटी रु. किमतीचे झालेलं होतं तर विक्री ५५,७५०कोटी रुपयांची झालेली होती आणि रोजगार निर्मिती ही १३७.७९ लाख एवढी झालेली आपल्याला दिसून येते. त्याचा अर्थ असा आहे, की महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या खादी आणि ग्रामोद्योगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झालेला आहे,

संशोधकाच्या मते, महात्मा गांधीजींनी ज्या रोजगार निर्मितीच्या उद्देशाने चरखा संघाची स्थापना केली होती तो उद्देश खादी आणि ग्रामोद्योगाच्या माध्यमातून पूर्ण झालेला आहे. गांधीजींचा भर हा मोठ्या उद्योगांच्या पेक्षा लघु आणि ग्रामोद्योगावर होता कारण ग्रामोद्योगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. वरील आकडेवारी पाहता महात्मा गांधीजींचा हा रोजगार विषयक दृष्टीकोन आज समर्पक असल्याचे आढळून येते.

- **निष्कर्ष :**

१) महात्मा गांधीजीनी मोठ्या उद्योगापेक्षा छोट्या उद्योगावर भर दिला जेणेकरून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल.

२) भारतासारख्या देशात जेथे भांडवलाची कमतरता आहे तेथे खादी आणि ग्रामोद्योग या सारखे गांधीजीनी सुरु केलेले उपक्रम यशस्वी ठरताना दिसत आहेत.

३) खादी आणि ग्रामोद्योगसारख्या उपक्रमामुळे देशाच्या आर्थिक वृद्धीत भर पडताना दिसत आहे.

४) खादी आणि ग्रामोद्योग यासारख्या उपक्रमामुळे देशातील स्वदेशी चळवळीला चालना मिळून देश स्वावलंबी होत आहे.

५) महात्मा गांधीजीचा विचारापेक्षा कृतीवर भर होता.

६) मोठ्या उद्योगापेक्षा छोट्या उद्योगामध्ये रोजगार निर्मितीची क्षमता जास्त असते.

७) महात्मा गांधीजींनी सुरु केल्या चरखा संघ सारख्या छोट्या उद्योगामुळे जर १३७.७९ लाख इतका रोजगार निर्माण होत असेल तर त्यांचे सर्वच आर्थिक विचार जर देशात अमलात आणले गेले तर देशातील बेकारी दूर झाल्याशिवाय राहणार नाही.

- **संदर्भ :**

१) कुमारप्पा,जे. सी. (१९४५). स्थैर्याची अर्थव्यवस्था. सर्व सेवा संघ प्रकाशन, वर्धा.

२) देसाई, नारायण. (२०१८). गांधी आणि त्यांचे आश्रम. नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद.

३) देसाई, नारायण. (२०१८). सर्वोदय आंदोलनाची कथा. नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद.

६) देशपांडे, एस. (२०१९). गांधी विचारांतील आरोग्य. पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे.

७) गांधी, महात्मा . (१९२७). रचनात्मक कार्यक्रम: त्याचा अर्थ आणि स्थान. नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

८ ) नारायण, जयप्रकाश. (१९७८). संपूर्ण क्रांतीकडे वाटचाल. सर्व सेवा संघ प्रकाशन, दिल्ली.

**लेख / जर्नल**

**१)** Gandhi Peace Foundation. (१९५७-२०२२). Gandhi Marg Journal. New Delhi.

**२ )** Sarvodaya Literature Series. (१९५५–२०२२). Varanasi Publications.

**वार्षिक अहवाल आणि संशोधन अहवाल**

१) All India Spinners' Association. (१९३५ ). Annual Report. Patna.

२) Khadi and Village Industries Commission (KVIC). (२०२२-

**संकेतस्थळे s**

१ ) https://kviconline.gov.in

२ ) https://www.mkgandhi.org